# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा गाव - परडे, तालुका-खालापूर व गाव-दापिवली, तालुका-पनवेल, पोस्ट - रसायनी, जिल्हा - रायगड, येथील प्रस्तावित पाईपव्दारे प्राप्त गॅस एलपीजी बॉटलिंग प्रकल्प व टँक लॉरीव्दारे वितरण (क्षमता- ३ X १४५० मेक्ट्रीक टन, टप्पा - 1 व 2 प्रत्येकी) विकसित करणेबाबत प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचे इतिवृत्त**

मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा गाव - परडे, तालुका- खालापूर व गाव-दापिवली, तालुका- पनवेल, पोस्ट - रसायनी, जिल्हा - रायगड, येथील प्रस्तावित पाईपव्दारे प्राप्त गॅस एलपीजी बॉटलिंग प्रकल्प व टँक लॉरीव्दारे वितरण (क्षमता - ३ X १४५० मेक्ट्रीक टन, टप्पा - १ व २ प्रत्येकी) विकसित करणेबाबत प्रकल्पाची /पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०४ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता "रसरंग" सभागृह, एचओसी कॉलनी, रसायनी, ता. खलापूर, जिल्हा-रायगड येथे आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं ई- ११९, पत्राव्दारा, बीओ.क्रंजेडी/ पीएच/डब्लुपीसी/ /बी -४८११, दि.१७-१२-२०१८ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

१) श्री किरण पाणबुडे, - **अध्यक्ष**
अप्पर जिल्हादंडाधिकारी -रायगड

२) श्री ज.शं .साळुंखे, -**सदस्य**
प्रादेशिक अधिकारी - रायगड
मप्रनि मंडळ,नवी मुंबई

३) श्री सचिन आडकर, -**समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-1,
मप्रनि मंडळ, नवी मुंबई

उपरोक्त पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती सभागृहात बैठक घेण्यासाठी स्थानापन्न झाली.

त्यावेळी सभागृहाच्या बाहेर काही स्थानिक गटागटाने प्रकल्पाच्या विरुध्द व सुनावणी रद्द करण्याची वारंवार घोषणा देत होते.

श्री. समिर खाने, रसायनि प्रकल्पग्रस्थ शेतकरी विकास सामाजिक संस्था, जि. रायगड यांनी सभागृहात येऊन समितीस सांगितले की सदरहू प्रकल्पास लागणा-या जमिन अधिग्रहण, मोबदला इत्यादीबाबत वाद व मतभेद असून त्याबाबत निर्णय प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प कुठल्या गट नंबरवर विकसित होणार याबाबत स्थानिकांना कोणतीही पूर्व सूचना देण्यात आलेली नाही. त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस स्थानिक जनतेस भेटून प्रत्यक्ष निवेदन स्विकारण्याची मागणी केली.

पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीने आपसात चर्चा करुन सभागृहाबाहेरिल उपस्थित स्थानिक गटाचे निवेदन स्विकारण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्ष, सदस्य व समन्वयक यांनी सभागृहाबाहेरील जमावाला सामोरे जाऊन त्यांनी दिलेले निवेदन स्विकारले.

निवेदन सादर करत असताना श्री काशीनाथ कांबळे, प्रतिनिधी, रसायनी प्रकल्प संघर्ष समिती, प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना यांनी सांगितले की प्रकल्पामुळे आठ गावे बाधित होणार असून जिल्हा परिषद सभापती, आठ गावातील तालुका सभापती व सर्व आठ गावांच्या प्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्थानिक प्रशासनास याबाबत सर्वेक्षण करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे काही स्थानिकांनी मुंबई उच्च न्यायालयात जमिन अधिग्रहणाबाबत याचिकाही दाखल केली असून सदरहू बाब ही न्यायप्रविष्ट आहे. तरीही प्रशासन पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी घेऊन प्रकल्पाबाबतच्या स्थानिकांच्या भावना लक्षात न घेता मान्यता देण्याचा घाट घालत

आहे हे पाहून स्थानिकांमध्ये असंतोष आहे. तरी सर्व स्थानिकांची अशी मागणी आहे की सदरहू सुनावणी रद्द करण्यात यावी. त्यांनी दिलेले निवेदन समितीने स्विकारताना स्पष्टीकरण दिले की सदरहू निवेदनाची नोंद घेण्यात आलेली असून शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल. निवेदन स्विकारल्यानंतर पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती सभागृहात स्थानापन्न् झाली, मात्र सभागृहाबाहेर सुनावणी रद्द करण्याच्या घोषणा देण्यात येत होत्या.

पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीने बैठकीचे कामकाज सुरु केले.

श्री सचिन आडकर, समन्वयक, पर्यावरण विषयक, जाहिर लोकसुनावणी तथा उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१, मप्रनि मंडळ, नवी मुंबई यांनी सुरवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले व जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण दिल्ली नवी, मंत्रालय बदल हवामान व वने यांच्या दिनांक १४ सप्टेंबर ,२००६ सुधारित दिनांक १ डिसेंबर ,२००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे व त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यांनी पुढे असे नमूद केले प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा गाव - परडे, तालुका- खालापूर व गाव-दापिवली, तालुका- पनवेल, पोस्ट - रसायनी, जिल्हा - रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित पाईपव्दारे प्राप्त गॅस एलपीजी बॉटलिंग प्रकल्प व टँक लॉरीव्दारे वितरण (क्षमता - ३ X १४५० मेक्ट्रीक टन, टप्पा - १ व २ प्रत्येकी) विकसित करणेबाबत प्रकल्पाची/ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी जनसुनावणी आयोजित करणेसाठी प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यास अनुसरुन आजची जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. यानंतर, त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सादर करण्याची विनंती केली.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी प्रस्तावित प्रकल्प व याबाबतच्या पर्यावरण विषयक उपाय योजनांची तसेच सुरक्षाविषयक उपाययोजना, रोजगाराबाबतची भूमिका/ माहिती याची सखोल माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थितांना दिली.

त्यानंतर श्री किरण पाणबुडे, अध्यक्ष ,यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना आपल्या त्या नोंदविल्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रतिनिधींकडून/प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री दत्तात्रय टी. देवळे Environmental Clearance of India, अध्यक्ष, निवृत्त अधिकारी व कर्मचारी मप्रनि मंडळ कल्याणकारी संघः-**

| **अनु. क्र.** | **आक्षेप / सूचना** | **प्रकल्प प्रवर्तकांनी / प्रकल्प सल्लागारांनी /पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी आक्षेपास/सूचनेस दिलेले उत्तर** |
|---|---|---|
| १ | सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांचे संपूर्ण भारतात ५१ एलपीजी बॉटलिंग प्रकल्प आहेत. सदरहू प्रकल्पात अद्यापपावेतो कधी मोठा अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी झालेली आहे काय? | प्रकल्पात सुरक्षिततेचे नियम अत्यंत काटेकोरपणे पाळण्यात येतात. त्याचप्रमाणे सुरक्षिततेसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची अत्यंत आधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येते. त्यामुळे अद्यापपावेतो कुठलाही मोठा अपघात प्रकल्पात झालेला नाही. |
| ३ | प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पात (onsite) व प्रकल्पाबाहेर (offsite) आपत्कालिन व्यवस्थापन योजना मा. | प्रकल्पात कोणतीही रासायनिक प्रक्रिया किंवा विसर्ग किंवा कोणत्याही प्रकारचे उत्सर्जन होणार नाही. त्याचप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | जिल्हाधिका-यांच्या मार्गदर्शनांनुसार तयार केलेला आहे काय? | प्रकल्पात आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेचे सर्व मानांकने पाळण्यात येतात. ओ.आय.एस.डी. व पीईएओ मार्गदर्शक निर्देशांनुसार प्रकल्पाचा आराखडा व सुविधा असतात. सदरहू प्रकल्प हा अत्यंत आधुनिक (ultra modern) असेल. पाईपलाईन्स् व्दारेच गॅस पुरविण्यात येईल. |
| ३ | प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर गावातील लोकांना वितरक म्हणून नेमणार का? | गावातील लोकांना वितरक नेमताना निश्चितच प्राधान्य देण्यात येईल. |

२) **श्री अ.सो.फुलसे, ECI व उपाध्यक्ष, निवृत्त अधिकारी व कर्मचारी मप्रनि मंडळ कल्याणकारी संघः**

| अनु. क्र. | आक्षेप / सूचना | प्रकल्प प्रवर्तकांनी / प्रकल्प सल्लागारांनी /पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी आक्षेपास/सूचनेस दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १ | प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर किती लोकांना रोजगार उपलब्ध होईल? प्रकल्पातील काम व रोजगार याचे प्रमाण ठरविण्यात आले काय? | प्रकल्प हा संपूर्णपणे यांत्रिक असेल. त्यामुळे १०-१२ स्थानिक कामगारांना शिक्षण, कोशल्य व गुणवत्तेच्या निकषांक प्रत्यक्ष रोजगार प्रकल्पात मिळेल. मात्र प्रकल्प कार्यान्वित झाल्यावरच परिसरात अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधि उदा.- बागकाम, कॅन्टीन्स विविध ठिकाणी चालविणे |

| | | |
|---|---|---|
| | | ब-याच प्रमाणात उपलब्ध होतील. |
| २ | कॉर्पोरेट सामाजिक बांधिलकी योजना प्रकल्प प्रवर्तक अंमलात आणणार आहेत काय? | प्रकल्प प्रवर्तक सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी बांधिल आहेत. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी देशातील प्रसिध्द टाटा इनस्ट्युट ऑफ सोशल सायन्सेस, चेंबूर, मुंबई या संस्थेची स्थानिक गरजांचा अभ्यासासाठी ( Need Base Social Assessment) नियुक्ती केलेली असून त्याचा अहवाल मिळाल्यावर त्यानुसार परिसरात सामाजिक उपक्रम राबविण्यात येतील. |
| | | पनवेल येथील आय.टी.आय.मधील २१,०० स्के.मीटर्सची दोन शेड दुरुस्त करणार आहोत. स्थानिक मुलामुलींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जिल्हा परिषदतील वैदकीय अधिकारी कार्यालयास संपर्क साधण्यात आलेला असून तेथे येणा-या रुग्णांसाठी सुविधा पुरविण्यात येतील. |

### ३) डॉ. सत्यवान एस.कदम, श्री साई फाऊन्डेशन, औरंगाबाद:-

| अनु. क्र. | आक्षेप / सूचना | प्रकल्प प्रवर्तकांनी / प्रकल्प सल्लागारांनी /पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी आक्षेपास/सूचनेस दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १ | प्रकल्प प्रवर्तकांनी अप्रत्यक्ष रोजगारात भरपूर वाढ होईल असे प्रतिपादन केले आहे. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी समाजातील दारिद्र्य रेषेखालील जनतेसाठी काय उपाययोजना आखल्या आहेत? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की भारत सरकारची इच्छा आहे की भारतातील दारिद्र्य रेषेखालील सर्व जनतेस गॅस जोडणी उज्जला योजनेतंर्गत पुरविण्यात यावा. आतापर्यंत २५ कोटी दारिद्र्य रेषेखालील जनतेस गॅस जोडणी करुन देण्यात आलेला आहे. |

### ४) श्री सतिश सुर्यवंशी, अशासकीय संस्था कार्यकर्ता, पुणे:-

| अनु. क्र. | आक्षेप / सूचना | प्रकल्प प्रवर्तकांनी / प्रकल्प सल्लागारांनी /पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी आक्षेपास/सूचनेस दिलेले उत्तर |
|---|---|---|
| 1 | प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पातील सुरक्षिततेची हमी देत आहेत. मात्र प्रकल्पात येणा-या वाहनांमुळे परिसरातील रस्ते कसे सुरक्षित राहतील? | प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की प्रकल्पात आंतरराष्ट्रीय दर्जाची सुरक्षा व्यवस्था पुरविणे बंधनकारक आहे. प्रकल्पात कुठलीही प्रक्रिया नाही. |

| | | |
|---|---|---|
| | | त्यामुळे कुठलाही रासायनिक प्रक्रिया, उत्सर्जन होत नाही. प्रकल्पात येणारा गॅस हा बंदिस्त पाईपव्दारे येणार आहे. गॅस सिलिंडर वाहतुक करताना येणारे ट्रक्सना शासकीय नियम व वाहतुक नियम पाळणे (घातक पदार्थ वाहतुक करण्याचे) बंधनकारक राहिल. |

**५)श्री विलास पोकळे, सदस्य, एन्वॉयर्मेंटल क्लब ऑफ इंडिया:-**

| **अनु. क्र.** | **आक्षेप / सूचना** | **प्रकल्प प्रवर्तकांनी / प्रकल्प सल्लागारांनी /पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी आक्षेपास/सूचनेस दिलेले उत्तर** |
|---|---|---|
| 1 | प्रकल्प विकसित करताना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे वृक्षतोड होईल. त्याबाबत व हरितपट्टा विकासासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी काही योजना आखली आहे काय? वृक्ष तोडल्यावर त्याची प्रकल्प परिसरात वा इतरत्र पुर्नलागवाड करण्याची काही योजना आहे काय? | प्रकल्प विकसित करताना झाडे वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तो प्रकल्प प्रवर्तकांच्या फायद्याचाच आहे. प्रकल्पात हरितपट्टा विकसित व संवर्धन करणे हे बंधनकारकच आहे. त्यापेक्षा जास्त झाडे लावण्यात येतील. |

स्थानिकांमधील काही लोक गटाने सभागृहात आले. ते प्रकल्पाच्या उभारणीच्याविरुध्द व बैठक रद्द करण्याची घोषणा देत होते. सभागृहातील पोलिस सुरक्षा व्यवस्थेने त्यांना शांत राहण्याचे

आवाहन केले. पोलिस सुरक्षा व्यवस्थेने स्थानिक गटास त्यांच्या काही सूचना असल्यास त्या शांततेने मांडण्याचे आवाहन केले. पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीनेही घोषणा देणा-या स्थानिक गटास शांत राहून त्यांचे पर्यावरणीय आक्षेप, सूचना उपस्थित करण्याचे व लेखी निवेदन असल्यास ते देण्याचे आवाहन केले. स्थानिक जनतेच्या भावना शासनास निश्चितच कळविण्यात येतील.

सदर आवाहनास प्रतिसाद म्हणून स्थानिकांन कडून बरीच निवेदने सुनावणी दरम्यान प्राप्त झाली. याची समितीने नोंद घेतली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही भारत सरकारच्या अधिसुचनेनुसार सदरहू प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक काही सूचना, आक्षेप असल्यास त्याची नोंद घेऊन स्थानिकांच्या भावना शासनास सादर करण्यासाठी आहे. मात्र आपण इतर उपस्थित केलेले मुद्द्यांचीही नोंद शासनास कळविण्यात येईल. तरी शांततेने पर्यावरणीय व इतर निवेदने लेखी व तोंडी देण्यात यावी. बैठकीत केलेल्या सर्व सूचनांची नोंद घेण्यात येईल. जनसुनावणी करण्याचा अध्यक्षांना अधिकार नाही असेही त्यांनी पुढे नमूद केले.

उपस्थितांनी सांगितले की स्थानिकांच्या प्रकल्पाबाबतच्या भावना तीव्र आहेत. पंचायत समितीने प्रकल्पाविरुध्द ठराव करुन शासनास पाठवविले आहेत. पनवेल, खालापूर नगरपरिषदेने प्रकल्पाच्या विरुध्द ठराव करुन शासनास पाठविलेले आहेत. जिल्हा परिषदही तसाच ठराव पाठवविणार आहे. तरी बैठक कायदेशीर रद्द करा. बैठक चालू राहिल्यास शासन एकतर्फी निर्णय घेईल असे स्थानिकांना वाटते. प्रकल्पाजवळच घोषित वनक्षेत्र (Notified Forest) आहे. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (National Green Tribunal) निवासी क्षेत्र व औद्योगिक क्षेत्र यात बफर झोन असावा असेच निर्देश दिलेले आहेत. सर्वेषण अहवाल अजूनही जाहिर व्हायचा आहे. त्यामुळे बफर झोन स्पष्ट होत नाही. नुकतेच

परिसरातील एका दुस-या प्रकल्पातील विषारी वायू गळतीमुळे माकडे व पक्षी मरण पावले आहेत. त्यामुळे स्थानिकांत भितीचे वातावरण आहे. शेतकरी बंधू-भगिनींनी सदरहू बिपीसीएल प्रकल्पाबाबत निषेध नोंदविला आहे. त्याबाबत निर्णय होत नाही, तोपर्यंत सुनावणी तहकूब करण्यात यावी.

पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीने उपस्थितांना सांगितले की आपला जर प्रकल्पास विरोध असेल, तर तसेही निवेदन लेखी स्वरुपात द्यावे.

सुनावणी दरम्यान एक निवृत्त प्राध्यापक, स्टील ऑथरिटी ऑफ इंडीया, यांनी असे मत मांडले की बिपीसिएल हा भारत सरकारचा उपक्रम असून त्यांनी इथेच प्रकल्प उभारण्याचा हट्ट का धरावा? शासनास दुसरीकडेही रस्ता व इतर सुविधा उपलब्ध आहेत, तेथे सदरहू प्रकल्प कार्यरत करावा. प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पपरिसराबाहेरिल आपत्कालिन नियंत्रण योजना (Off-site Disaster Management Plan) बनविलेला नाही.

रसायन प्रकल्पग्रस्त शेतकरी संघ यांनी समितीसमोर उभे राहून सांगितले की हा पाच पिढ्यांचा संघर्ष आहे. संबंधित प्रकल्प दापिवली व पराडे गाव क्षेत्रात उभारणार असेल, तर प्रकल्पापासून अर्धा कि.मी. अंतरावर मोहोपाडा गाव आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात ते 5.5 कि.मी. दाखविले आहे. घोषित पुरातन वास्तु असलेला माणिकगड किल्ला व घोषित कर्नाला पक्षी अभयारण्य याचे प्रकल्पापासूनचे अंतर हे जाणूनबुजून जास्त दाखविलेले आहे. प्रकल्प सल्लागार यांनी जलद पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (Rapid Environment Impact Assessment Report) तयार केलेला आहे. त्याऐवजी व्यापक पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (Comprehensive Environment Impact Assessment Report) आवश्यक होता. त्यांनी पर्यावरण सल्लागार अल्ट्रा टेक यांनी चुकीचा अहवाल तयार केला असून पर्यावरण सल्लागार हे शासनाची व जनतेची दिशाभूल करत आहेत असा आरोप केला व

चुकीच्या अहवालावर जनसुनावणी कशी आयोजित करण्यात येते असा प्रश्न विचारला. त्यांच्याबरोबर इतर उपस्थित व्यक्ती गटागटाने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल चुकीचा आहे अशा घोषणा देत होते. अध्यक्ष व सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना याबाबत उपस्थित मुद्दयांवर स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू अहवाल हा मसुदा अहवाल (Draft Report) आहे. त्यातील सर्व त्रुटी दुरुस्त करण्यात येतील. त्याचप्रमाणे जनतेने उपस्थित केलेले मुद्दे, आक्षेप, सूचना यांची नोंद घेऊनच अंतिम अहवाल तयार करण्यात येऊन तो भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती ही प्रकल्पास मंजूरी देणे वा न देणे हा निर्णय घेत असते.

मात्र संबंधित स्थानिक जनतेच्या गटाने प्रकल्प सल्लागार हे स्थानिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप केला. त्यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प सल्लागारांनी भारत सरकारने मंजूर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल अभ्यासाची रुपरेघा (टीओआर) प्रकल्पग्रस्त परिसराच्या 10 कि.मी. परिघाचे पर्यावरणीय मुल्यमापन केलेले नाही. प्रकल्पापासून सर्व गावांची अंतर चुकीची दाखवली आहेत. मा. मुख्यमंत्र्यांनी सदरहू प्रकल्पाबाबत सर्वेषणाचे आदेश देऊन आठ महिने झाले, तरी सर्वेषण पुर्ण झालेले नाही. तर तीन महिन्यांतच 10 कि.मी.परिघातील गावांचा पाणी,हवा, व इतर पर्यावरणीय आघात मुल्यांकन सर्वेषण कसे पूर्ण होऊ शकते असा प्रश्न उपस्थित केला.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी लेखी आक्षेपकांना पोच देण्याची सूचना संबंधितांना केली. त्यांच्या आदेशाप्रमाणे लेखी सूचना, निवेदने यांना पोच देण्यात आली.

सर्व प्राप्त सूचना व आक्षेप यांची यादी सोबत जोडली आहे. (सहपत्र-“अ”).तसेच, सर्व आक्षेप व सूचना हे या अहवालाचा भाग असतील.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी जनसुनावणी संपल्याचे जाहिर केले.

**(सचिन आडकर )**
समन्वयक,पर्यावरणविषयक
जाहिर लोकसुनावणी
समिती
तथा
उपप्रादेशिक अधिकारी,रायगड-१,मप्रनि मंडळ,
नवी मुंबई

**(जे. एम. साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिकअधिकारी,
मप्रनि मंडळ,रायगड.

**(किरण पाणबुडे)**
अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर
लोकसुनावणी समिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी,रायगड,
जिल्हा- रायगड